Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 5, December 2023; Pages 140 – 143

DOI: 10.5281/zenodo.10072917

Original Research Article

# महात्मा गांधींचे आर्थिक समानतेविषयीचे विचार

प्रा. डॉ. सुरेश चंद्रकांत मेहेत्रे[1], कु. पूजा ज्ञानोबा शेळके[2]

[1]प्राध्यापक आणि अर्थशास्त्र विभाग प्रमुख, बी. रघुनाथ महाविद्यालय, परभणी ४३१४०१ महाराष्ट्र, भारत

[2]संशोधक विद्यार्थिनी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड ४३१६०६ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: [1]mehetresuresh@gmail.com; [2]poojashelke2107@gmail.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 27 October, 2023 | Published: 28 October, 2023

## गोषवारा

महात्मा गांधी यांच्या मते, भारताचा परिपूर्ण आर्थिक विकास करण्यासाठी सामाजिक आणि राजकीय क्षेत्राबरोबरच आर्थिक क्षेत्राचाही विचार करणे महत्त्वाचे आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतावर इंग्रजांचे राज्य होते. इंग्रजांच्या जाचक आणि असहाय्य नीतीमुळे भारतामध्ये आर्थिक दारिद्र्यता निर्माण झाली होती. आर्थिक असमानता निर्माण होण्यामागचे प्रमुख कारण म्हणजे औद्योगिकरण आहे हे गांधीजींच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांनी लघु उद्योगांना चालना देण्याचे ठरविले. औद्योगिकीकरणामुळे भारतातील बंद पडलेले कुटिरोद्योग सुरू करून लोकांना स्वदेशी वस्तू वापरण्यासाठी प्रेरित केले. गांधीजींचा या मागचा मुख्य हेतू असा होता की, आयात कमी करणे आणि स्वयंपूर्ण ग्राम निर्माण करणे.

गांधीवादी आर्थिक व्यवस्था ही साधेपणा, विकेंद्रीकरण, स्वयंपूर्णता, सहकार्य, समानता, सर्वोदय, अहिंसा, मानवी मुल्ये, स्वयंपूर्ण ग्राम, मुलभूत उद्योगांचे राष्ट्रीयीकरण, स्वदेशी आणि विश्वस्ताच्या सिद्धांतावर आधारित आहे. यामधून श्रम, भांडवल, उत्पादन वितरण, नफा इत्यादी समस्यांचे निराकरण होईल. महात्मा गांधी यांच्या विश्वस्त सिद्धांताचा अवलंब करून आर्थिक समानता प्रस्थापित करता येवू शकते. त्यांनी भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा विरोध करून समाजवादी अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला.

**सुचनक शब्द:** विकेंद्रीकरण, आर्थिक समानता, विश्वस्त, भांडवलशाही

## प्रास्ताविक

महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार हे अशा समाजव्यवस्थेचे संकल्पचित्र आहे जिथे वर्णभेदाला स्थान नाही. सामाजिक न्याय आणि समतेच्या तत्त्वावर आधारलेले गांधीजींचे हे विचार आहेत. त्यांचे अर्थशास्त्र नैतिक मूल्यावर

आधारित असून ज्यातून भारतीयांना मोठा संदेश मिळतो. त्यांनी कृषी संबंधीत श्रमप्रधान उद्योगांचे महत्त्व सांगितले त्यातून देशाचा आर्थिक विकास सहज साध्य करता येतो. गांधीजींचे विचार हे भारतीय अर्थव्यवस्थेला अनुसरून होते. त्यांनी अनियंत्रित भांडवलशाहीतील नफेखोरी, संपत्ती संचय, आर्थिक शोषण अशा सर्व अतिरेकी वैशिष्ट्याना विरोध दर्शविला होता. प्रस्तुत लेखात महात्मा गांधी यांनी आर्थिक समानता प्रस्थापित करण्यासाठी मांडलेले सिद्धांत आणि त्यांचे आर्थिक विचार पाहिलेले आहेत. त्यांनी मांडलेल्या सिद्धांताचा उपयोग आधुनिक भारताच्या आर्थिक विकासात कसा करता येईल या विषयी अभ्यास केला आहे.

**उद्दिष्ट्ये**

१. आधुनिक भारतात आर्थिक समानता प्रस्थापित करण्यासाठी गांधीवादी विश्वस्त सिद्धांत लागू होण्याची शक्यता शोधणे.
२. सध्याच्या अर्थव्यवस्थेला पर्याय म्हणून गांधीवादी स्वयंपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्था लागू होते का ते पाहणे.
३. आर्थिक विकेंद्रीकरणाचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील प्रभाव अभ्यासणे.

**संशोधन पद्धती**

महात्मा गांधी यांचे आर्थिक समानतेविषयीचे विचार पाहण्यासाठी आणि उद्दिष्ट्याना अनुसरून गुणात्मक आणि विश्लेषणात्मक माहिती असणे आवश्यक आहे. जेणेकरून संशोधन परिपूर्ण आणि उत्कृष्ट होईल. त्यासाठी द्वितीयक सामग्रीचा आधार घेतलेला आहे. यामध्ये प्रामुख्याने पुस्तके, मासिके, साप्ताहिके, लेख, वार्षिकांक इत्यादींचा वापर करण्यात आला आहे. अधिक तंतोतंत माहिती मिळविण्यासाठी इंटरनेटच्या माध्यमातूनसुद्धा माहिती घेण्यात आलेली आहे.

**महात्मा गांधी यांचे आर्थिक समानतेविषयीचे विचार**

**विश्वस्त संकल्पना किंवा सिद्धांत**

महात्मा गांधी यांनी १९०३ मध्ये विश्वस्त संकल्पनेचा सिद्धांत मांडला, त्यामध्ये त्यांनी भांडवलाचा खरा मालक भांडवलदार नसून संपूर्ण समाज त्याचा मालक आहे आणि भांडवलदार हा केवळ त्याची देखभाल करणारा आहे, हा या सिद्धांताचा पाया आहे. गांधीजींच्या मते भांडवलशाहीमुळे भारतामध्ये आर्थिक असमानता निर्माण झाली. यांत्रिकीकरणामुळे भारतातील घरगुती उद्योग बंद पडल्यामुळे बेकारी मोठ्या प्रमाणात वाढली आणि त्यातून गरीब लोकांचे भांडवलदाराकडून शोषण केल्या जाऊ लागले. या सर्व समस्यांवर महात्मा गांधीनी विश्वस्त संकल्पना समोर आणली. त्यांच्या मते जी व्यक्ती आपल्या गरजेपेक्षा जास्त संपत्ती जमा करते त्या व्यक्तीने केवळ आपल्या आवश्यकता पूर्ण होतील एवढ्याच संपत्तीचा वापर करावा आणि उर्वरित संपत्तीचे व्यवस्थापन त्याने एक विश्वस्त म्हणून करावे. उर्वरित संपत्तीचा उपयोग समाज कल्याणासाठी करावा.

या विश्वस्त सिद्धांतामुळे आर्थिक समानता निर्माण केल्या जाऊ शकते. गांधीजींच्या मते सर्व लोकांची क्षमता एकसारखी नसते त्यामुळे ज्यांच्याकडे अधिक कमावण्याची क्षमता आहे त्यांनी अधिक कमावलेच पाहिजे; परंतु आपल्या गरजा पूर्ण होतील एवढाच वापर करावा. त्यांच्या मते भांडवलदारांनी आपल्या गरजा मर्यादित कराव्यात साध्या जीवनशैलीचा स्वीकार करून देशातील दारिद्र्य दूर करण्यासाठी प्रयत्न करावेत. महात्मा गांधीची विश्वस्त ही संकल्पना कालसुसंगत तर आहेच; शिवाय व्यवहार्यही आहे. आधुनिक भारताच्या आर्थिक विकासात हा सिद्धांत लागू करता येऊ शकतो. यामुळे देशातील आर्थिक विषमता दूर होण्यास मदत होईल. त्याबरोबरच भूखमारी, शोषण, दारिद्र्य, आरोग्य, शिक्षण यासारख्या समस्या देखील सोडवल्या जाऊ शकतात.

**स्वयंपूर्ण ग्राम व्यवस्था**

प्राचीन भारतातील जी खेडी होती, तेथील शेती ही समृध्द होती. खेड्यातील लघुउद्योगांना लोकांच्या गरजांची पूर्तता करता येत होती. ग्रामीण भागातील लोकांना शहरामध्ये जाण्याची आवश्यकता नव्हती. परंतु औद्योगीकरण आणि इंग्रजांच्या अनैतिक धोरणांमुळे खेड्यांची स्वयंपूर्णता नष्ट झाली. गांधीजींच्या मते, भारतातील अर्थव्यवस्थेचा प्रमुख आधार शेती व शेतीशी संबंधित उद्योग आहेत. त्यासाठी भारताचा आर्थिक विकास साधायचा असेल तर खेडी स्वयंपूर्ण व्हायला हवीत. स्वयंपूर्ण ग्राम अर्थव्यवस्था बनविण्यासाठी महात्मा गांधी यांनी वेगवेगळ्या लघुउद्योगांना चालना दिली. इंग्रजांच्या वस्तूंवर बहिष्कार टाकून स्वदेशी वस्तूंचा स्वीकार केला. ग्रामीण भागातील लोकांना लघु उद्योग सुरु करण्यासाठी प्रोत्साहित केले आणि त्यासाठी प्रशिक्षण सुद्धा दिले.

**विकेंद्रीकरण**

केंद्रीकृत उद्योगांच्या दुष्कृत्त्या दूर करण्यासाठी गांधीजींचा लघुस्तरीय विकेंद्रित आणि लघुस्तरीय सहकारी संघटनेवर विश्वास  होता. कुटिरोद्योग आणि ग्रामोद्यागांच्या विकासाद्वारे आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण घडवून आणणे हा त्यांचा मुख्य हेतू होता.

**भांडवलशाहीच्या उत्पादन पद्धतीचा विरोध**

विविध घटकांमध्ये उत्पादनाची विभागणी करण्याच्या पद्धतीही गांधीजींच्या मते हिंसक आहेत. अवलंबिलेले तंत्र घटकाचे एकक देण्याचा प्रयत्न करते जे त्याने केलेल्या योगदानानुसार आहे. साहजिकच यामुळे उत्पन्नाची ज्वलंत असमानता निर्माण होते. त्यामध्ये एक विलासी जीवन जगतो आणि दुसरा उपाशी राहतो. वितरणाची ही पद्धत हिंसक आहे. अशा पद्धतीला अहिंसक पद्धतीने बदलले पाहिजे. यंत्राच्या दुष्कृत्त्यावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करताना महात्मा गांधी म्हणतात, “मी समाजाच्या खर्चावर काही लोकांचे संवर्धन करणार नाही. सध्या यंत्र अल्पसंख्यांकांना जनतेच्या शोषणावर जगण्यासाठी मदत करत आहे. संपत्तीचे केंदीकरण काहींच्या हातात नाही तर सर्वांच्या हातात हवे.” ग्रामीण भारतातील प्रचंड दारिद्र्य, बेरोजगारी आणि यांच्यावर तत्काळ उपाय आणि स्वयंपूर्णता प्राप्त करण्यासाठी त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक योजनांसाठी उत्पादन पद्धती ही श्रम-केंद्रित असावी असे गांधीजींचे मत होते. या पद्धतींचा वापर केल्यामुळे लोकांच्या वेगवेगळया कौशल्याचा वापर होईल आणि बेकारी संतुष्टात आणण्यास मदत होईल.

**सर्वोदय**

गांधीवादी आर्थिक व्यवस्थेत मानवी विकासाचे अंतिम उद्दिष्ट साध्य करण्याचे दोन टप्पे आहेत. पहिला टप्पा म्हणजे राजकीय स्वातंत्र्य मिळविणे आणि दुसरा आर्थिक स्वयंपूर्णता निर्माण करणे. गावातील कुटीर उद्योगांना चालना देवून प्रत्येक कुटुंबासाठी उत्पन्नाची किमान पातळी सूनिश्चित करणे हे सर्वोदय योजनेचे मुख्य उद्दिष्ट्य होते. सर्वोदयाचे उद्दिष्ट्य वर्गहीन, जातिहीन आणि शोषणरहित समाज असे आहे. सर्वोदय हे व्यावहारिक आहे ते प्रत्यक्षात आणले जाऊ शकते. समाजातील असमानता कमी करणे हा त्याचा मुख्य उद्धेश आहे. महात्मा गांधीच्या मते विज्ञान + हिंसा = संपूर्ण विनाश तर विज्ञान + अहिंसा = सर्वोदय. सर्वोदायाच्या माध्यमातून विषमता दूर करून समाजातील सर्व लोकांची प्रगती घडवून आणणे असा मुख्य हेतू महात्मा गांधीनी समोर मांडला होता.

**निष्कर्ष**

एकंदरीत विचार केला तर महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचाराचा भारतीय अर्थव्यवस्थेवर नक्कीच प्रभाव पडू शकतो. 1991 पासून भारताने साधारणपणे बाजाराभिमुख मुक्त आर्थिक व्यवस्थेचे अनुसरण केले आहे; परंतु जुन्या समस्यांचे निराकरण करणे बाकी आहे. त्याबरोबरच उच्च विकास साध्य करणेही बाकी आहे. त्यासाठी गांधीजींच्या

विचारांचा अवलंब केला तर उत्पन्नाचे समान वितरण होवू शकते आणि श्रम केंद्रित उत्पादन पद्धतीचा पुरस्कार केल्यामुळे बेरोजगारी संपुष्टात येऊ शकते. यासोबतच विश्वस्त संकल्पनेचा भारतीय अर्थव्यवस्थेत अवलंब केल्यास आर्थिक विषमता नष्ट होवून समता प्रस्थापित केल्या जाऊ शकते. स्वयंपूर्ण ग्राम अर्थव्यवस्थेच्या विचारातून भारतातील खेडी स्वयंपूर्ण करून शोषण, दारिद्रयता, आरोग्य, कुपोषण यांसारख्या समस्या सोडविल्या जाऊ शकतात.

गांधीजींच्या विकेंद्रीकरणाच्या संकल्पनेतून देशाच्या विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर सामाजिक न्यायासह विकासाची फळे लोक उपभोगू शकतात. गांधीजींच्या आर्थिक विचारांचा अवलंब केला गेल्यास भारतातील प्रत्येक व्यक्तीला त्याच्या क्षमता विस्तारित करण्यासाठी आणि पूर्ण स्वातंत्र्याचा उपभोग घेण्याची समान संधी प्राप्त होईल. बहुतेक समकालीन समस्या भांडवलशाही, शहरी आणि मोठ्या उद्योगाभिमुख आर्थिक उपक्रमामुळेच निर्माण होतात. या सर्व समस्यांवर उपाय म्हणून गांधीवादी आर्थिक व्यवस्था उपयोगी येऊ शकते.

**संदर्भ सूची**

१. मोहनदास करमचंद गांधी : हिंद स्वराज (१९२१) : नवजीवन मुद्रणालय, अहमदाबाद.
२. M. Maharajan: Economic Thoughts of Mahatma Gandhi : Discovery Publishing Pvt. Ltd. (19 May 2008).
३. खान इक्बाल : 'पंचायती राज एवं ग्रामीण विकास योजना' : रितू पब्लिकेशन, जयपूर, 2004
४. भाऊ धर्माधिकारी: 'गांधी विचार दर्शन-राजकारण' : खंड-1 म. गा. स्मारक निधी प्रकाशन, पुणे 1995
५. डॉ. भा. ल. भोळे: भारतीय राजकीय विचारवंत : विद्या बुक्स, औरंगाबाद.
६. https://www.esakal.com
७. bhaskar.com